## ANNEXURE- 29

### Contribution of District / University / State / National level initiatives for Organization

### 1. Immunization Camp Attendance Performance- 01

| Year 2019-2020 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|
| 0 | 0 | 01 |




**Cattle Health Check up camp with Livestock Development Officer Ambajogai**

## 2. Swach Bharat Abhiyan – Plactic Free India  Programme- October 2022

**Hon. Minister Anuragji Thakur called to oragnise Plastic Free India programme. Reciprocating call  programme was arranged from 1-30 Oct 2022 where NSS voluntrees contributed 4000 hours of service to keep campus and adopted village clean. Series of lectures for 30 days was arranged to motivate students for the overall development of the students.**

कृषी,राजकारण व सामाजिक घडामोडींचा वेध घेणारे स्वतंत्र विचाराचे वृत्तपत्र

R.N.I. No. /MAHMAR /231559 /2002

# कृषी सोबती

|बीड|   दि.१५ऑक्टोबर२०२१

### कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे स्वच्छ भारत अभियानचे बारावे पुष्प

## स्वच्छ भारत अभियानात सहभाग म्हणजे देशसेवेची संधी - शांतीदूत अविनाश मोरे







अबाजोगाई | प्रतिनिधी
दि. १२ ऑक्टोबर
भारत सरकारद्वारे राबविण्यात येत असलेले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी प्रशासनाच्या निर्देशानुसार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, मार्गदर्शक शांतीदूत श्री अविनाश मोरे, प्रमुख अतिथी श्री प्रदिप पुजदेकर तर व्यासपीठावर डॉ. प्रताप नाळवंडीकर, डॉ. रवींद्र चव्हाण, डॉ. बसवलिंगप्पा कलालबंडी यांची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब ठोंबरे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, 'स्वच्छ भारत अभियानाचा' उद्देश केवळ आपल्या सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करणे एवढेच मर्यादित नाही तर नागरिकांच्या सहभागातून जास्तीत जास्त वृक्ष लागवड करुन कचरामुक्त व प्रदूषणमुक्त वातावरण बनविणे आहे. तसेच देशात पर्यटनास चालना देण्याच्या दृष्टीने स्वच्छ भारताची निर्मिती आवश्यक व महत्त्वपूर्ण आहे तसेच डॉ. ठोंबरे पुढे बोलताना असेही म्हणाले की, देशाची प्रतिमा आणखी उंचावण्यासाठी या अभियानाकडे प्रत्येकाने संधी म्हणून पाहिले पाहिजे.
आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शांतीदूत श्री अविनाश मोरे म्हणाले की, कोरोनासारख्या साथ रोगाच्या काळात स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची आहे. संत गाडगेबाबाची शिकवण आजही महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छतेचा वसा घेऊन जगले पाहिजे. स्वच्छ भारत अभियानात सहभाग म्हणजे देशसेवेची संधी असे आपण समजले पाहिजे.
प्रमुख अथिती श्री प्रदीप पुजदेकर आपल्या मनोगतात म्हणाले की, आपल्याला गांधीजीच्या विचारधारेतून व त्यांच्या नजरेतून भारताकडे पहावे लागेल. त्यासाठी आपण सामाजिक जाणीव जोपासायला हवी. त्या दृष्टीने स्वतःसाठी, गावासाठी व देशासाठी सकारात्मक कार्य करण्याची तळमळ असायला हवी. पुढे बोलताना ते म्हणाले की, मानवी जीवनात पैसा हा सर्वस्वी नाही तर आरोग्यदायी आयुष्यही महत्त्वाचे आहे. त्यासाठी खेळ व व्यायाम आवश्यक आहे. भारत देश महासत्ता व्हावा यासाठी कृषि क्षेत्राचा वाटा वाढवण्यासाठी कृतिशील असले पाहिजे.
कार्यक्रमात विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सुमित शेळके व ऋतुजा जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. बसलींगप्पा कलालबंडी यांनी मांडले, सुत्रसंचालन श्रीमती पुजा वावरगीरे यांनी केले तर आभार श्री भास्कर देशपांडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. मोहन धुप्पे, डॉ. सुहास जाधव, प्रा. सुनिल गलांडे, डॉ. संजय राठोड, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. योगेश वाघमारे, डॉ.अजित पुरी, प्रमोद कळसकर, श्री अनंत मुंडे, श्री यादव पाटील, श्री बालासाहेब चिल्लरगे, श्री अनिल खेडेकर, श्री स्वप्निल शिल्लार, श्री राजेश रेवले, श्री प्रकाश मुजमुले, नंदकिशोर मोरे आदींनी परिश्रम घेतले.

# पर्यावरण संवर्धनासोबतच आरोग्य जोपासण्याचे कार्य कृषि महाविद्यालयातून होतेय : अधिष्ठाता डॉ.भास्करराव खैरे

## कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे स्वच्छ भारत अभियानाचे अठ्ठाविसावे पुष्प

अंबाजोगाई (प्रतिनिधी)– भारत सरकार द्वारे राबवण्यात येत असलेले वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी प्रशासनाच्या निर्देशानुसार, कृषि महाविद्यालय आंबेजोगाई अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात येत आहे.या अभियानाचे दिनांक २८ ऑक्टोबर रोजी अठ्ठाविसावे पुष्प गुंफण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे,मार्गदर्शक स्वराती ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता

पान ३ वर


दिव्य लोकप्रभा
Sat 30-10-2021
Page No. 5


# स्वच्छ भारत अभियानातून श्रमसंस्कार रुजतात गटशिक्षणाधिकारी चंदन कुलकर्णी यांचे मत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

माणूस सर्वसामान्य असो की असामान्य, प्रत्येकालाच आपापल्या क्षमतेनुसार श्रम करता येतात. श्रम हे मानवी जीवनातील एक श्रेष्ठ मूल्य आहे. त्यावरच आपल्या आयुष्याची इमारत उभी होत असते. अशा स्वच्छ भारत अभियान अभियानातून आपल्या अंगी श्रमसंस्कार रुजत असतात असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी चंदन कुलकर्णी यांनी केले.भारत सरकार द्वारे राबविण्यात येत असलेले स्वच्छ भारत अभियान हे एक देशव्यापी अभियान आहे या अभियानाअंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी प्रशासनाच्या निर्देशानुसार, कृषि महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण हे अभियान राबविण्यात येत आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंदन कुलकर्णी बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख अतिथी म्हणून




आंबेजोगाई येथील माजी उपनगराध्यक्ष श्री सतीश लोमटे, शिवाजी खोगरे, वृक्षमित्र राजेसाहेब किर्दत यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या मनोगतात सतीश लोमटे म्हणाले की ,पर्यावरणाचा होणारा –हास लक्षात घेऊन निसर्गसंवर्धन, वृक्षलागवड व संगोपनाचे कार्य राष्ट्रीय पातळीवर होत आहे. या कार्यात अंबाजोगाई येथील कृषि महाविद्यालय मोलाची भर घालत आहे. त्यातूनच या कृषि महाविद्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड व संवर्धनातून ऑक्सीजन पार्क निर्मिती होत आहे.शिवाजी खोगरे आपल्या भाषणात म्हणाले की, स्वच्छता ही आरोग्याच्या दृष्टीने आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. बाह्य स्वच्छतेबरोबरच आपल्या मनाची अंतर्गत स्वच्छताही अत्यंत महत्वाची असते. अशा अंतर्बाह्य स्वच्छतेतून युवक–युवती मध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत होत असतो. वृक्षमित्र राजेसाहेब कीर्दत यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानातून व्यक्तिगत स्वच्छतेबरोबरच आपला देश स्वच्छ होत आहे. आणि यातूनच आपल्या देशाची प्रतिमा उजळून निघण्यास मदत होईल. जिथे स्वच्छता व सुंदरता असते तिथे ईश्वराचा वास असतो. या अभियानाद्वारे कृषि महाविद्यालयाचा परिसर सुंदर आणि स्वच्छ झाला आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र चव्हाण यांनी मांडले, सुत्रसंचालन डॉ. अजित पुरी यांनी केले तर आभार प्रमोद कळसकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बसलिंगाप्पा कलालबंडी, डॉ.मोहन धुप्पे, डॉ. सुहास जाधव, प्रा. संजय राठोड, डॉ. योगेश वाघमारे, प्रमोद कळसकर, श्रीमती माया भिकाने, अनंत मुंडे, अनिल खेडेकर, यादव पाटील, स्वप्नील शिल्लार, भास्कर देशपांडे, श्रीमती पूजा वावरगीर, नंदकिशोर मोरे, प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले.



वृक्ष लागवड व संवर्धन



नगर परिषद, अंबाजोगाई
Shot on OnePlus


कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई
COLLEGE OF AGRICULTURE, AMBAJOGAI
राष्ट्रीय सेवा योजना
PODAR


कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई
COLLEGE OF AGRICULTURE, AMBAJOGAI
राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME


COLLEGE OF AGRICULTURE, AMBAJOGAI
NATIONAL SERVICE SCHEME

### 3. Swami Vivekanand – Ma Jijau Jayanti (Youth week 12-18 January)

One week enlightening programme for youths was organized on ewe of Swami Vivekanand – Ma Jijau Jayanti.

On **12.01.2021** was inaugural day Shri Dagdudada Lomte (SocialWorker) was speaker on Youths role in social responsibility and Patriotism.Shri Sudharshan Rapatwar (Journalist) was chief guest while Dr. B.M.Thombre,ADP,COA,Ambajogai was Presisdent of the programme.

On **13.01.2021** Shri Rajesaheb Kirdant (ZP Teacher cum Nature Lover) was speaker while Dr. B.M.Thombre,ADP,COA,Ambajogai was Presisdent of the programme.

On **14.01.2021** Shri Shivkumar Nirmale (Vice Principal, Yogeshwari Mahavidyalaya, Ambajogai) was speaker on Swami Vivekanand role in youths development.Dr Balasheb Chavan (Ex. Principal, Yogeshwari Mahavidylaya,Ambajogai) andShri Dajisaheb Lomte (Director, Ambajogai Sahakari Sakar Kharkana) graced as chief guestof the programme while Dr. B.M.Thombre,ADP,COA,Ambajogai was Presisdent of the programme.

On **15.01.2021** Shri Nandkishorji Munda (SocialWorker, Ambajogai. Dr D. A.Chavan (Ex.Registrar, VNMKV,Parbhani)graced the programme as chief guest. while Dr. B.M.Thombre, ADP, COA,Ambajogai was Presisdent of the programme.

On **16.01.2021** Shri Kamlakar Kamble (Principal, Kholewshwar Mahavidylaya, Ambajogai) spoke on Swami Vivekenand while Dr. B.M.Thombre,ADP,COA,Ambajogai was Presisdent of the programme.

On **17.01.2021** ShriIrfan Sheikh (Manavlokh, Ambajogai) spoke on Swami Vivekenand while Dr. B.M.Thombre,ADP,COA,Ambajogai was Presisdent of the programme.

On **18.01.2021** Senior Citizens of Morewadi and Ambejogai werepresent for concluding session while Dr. B.M.Thombre,ADP,COA,Ambajogai was Presisdent of the programme.

R.N.I. No. /MAHMAR /231559 /2002

**कृषी सोबती** २२जानेवारी२०२१

# कठिन परिस्थितीत खंबिरपणे उभे राहण्याची प्रेरणा स्वामी विवेकानंदांकडून घ्यावी - इरफान शेख



अंबाजोगाई(प्रतिनिधि):येथील कृषी महाविद्यालयात, स्वामी विवेकानंद जयंतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १२ ते १८ जानेवारी २०२१ या कालावधीत राष्ट्रीय युवा सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात येते.

अनुभव हाच आपला सगळ्यात मोठा गुरु असतो, आयुष्यात ठेच लागल्याशिवाय माणसाच्या अंगी अंगभूत शहाणपण येत नसते. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे मार्गदर्शक, कृषी व तंत्र विभाग प्रमुख तथा मानवलोक चे श्री इरफान शेख यांनी केले. तसेच कठीण परिस्थितीसमोर गुडघे न टेकता खंबीरपणे सामोरे जाण्याची प्रेरणा स्वामी विवेकानंदांच्या विचारातून घ्यावी असेही ते म्हणाले.

कार्यक्रमास महेश सावंत, दिलीप अडसूळ, संतोष केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते.

महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर पाहून, " हे महाविद्यालय चौफेर हरित व विविध रंगी फुलांचे महाविद्यालय झाले आहे " असे गौरवोद्गार प्रमुख अतिथी म्हणून बोलताना पत्रकार श्री दिलीप आरसुळ यांनी काढले.

सत्याच्या वाटेवरती चालत असताना एकटे पडलात तरी चालेल, पण चुकीच्या गोष्टीचे समर्थन करणाऱ्या गर्दीमध्ये मिसळू नका असे आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी समाजातली आपली प्रतिमा आणि चारित्र्याचे पावित्र्य सांभाळले पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विद्या तायडे यांनी मांडले, सुत्रसंचालन कु. माधुरी करडे तर आभार प्रा. सुनिल गलांडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दिपक लोखंडे, श्री सुनील गिरी, सय्यद इरफान, स्वप्निल शिल्लार, यांनी विशेष परिश्रम घेतले.

R.N.I. No. /MAHMAR /231559 /2002

कृषी सोबती

२४जानेवारी२०२१

# विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणिवा जागृत ठेवून कृषी उन्नतीसाठी कार्य करावे

## युवा सप्ताहात सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांचे मार्गदर्शन








अंबाजोगाई (प्रतिनिधि) : कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे स्वामी विवेकानंद जयंतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १२ ते १८ जानेवारी या कालावधीत ' राष्ट्रीय युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात येते.

युवा सप्ताह सांगता कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून, कृषि महाविद्यालय आंबेजोगाई चे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. मार्गदर्शक म्हणून माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत मा. राजकिशोरजी मोदी यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्तात्रय दमकोंडवार तर व्यासपीठावर डॉ. अरुण कदम, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा. राजकिशोरजी मोदी म्हणाले की, कृषि महाविद्यालयातील हा ' राष्ट्रीय युवा सप्ताह ' म्हणजे विचारांचा जागर आहे. अशा शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमातूनच आजचे युवक उद्याचे कर्तव्यदक्ष, आदर्श आणि चांगले नागरिक निर्माण होतील. पुढे बोलताना ते असेही म्हणाले की, भारत महासत्ता बनण्यासाठी स्वामी विवेकानंदांच्या विचारांची गरज आहे.

कृषिच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक भान राखून, जाणिवेतून आणि सामाजिक बांधिलकीतून शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कार्य करावे असे उद्गार कृषि महाविद्यालय अंबाजोगाई चे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात काढले. डॉ. ठोंबरे पुढे बोलताना म्हणाले की, युवकांनी समाजासाठी अखंड योगदान दिले पाहिजे. माणुसकीच्या शुद्ध भावनेतून समाजसेवा केली पाहिजे. युवकांमध्ये गुण- अवगुण पाहायला मिळतात परंतु त्यातील चांगले गुण हेरून त्याकडे सकारात्मकपणे पाहिले पाहिजे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच विद्यार्थी प्रतिनिधी माधुरी करडे हिने आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात, भारत हा तरुणांचा देश आहे. युवाशक्ती हीच खरी देशाची संपत्ती असते, त्यामुळे ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानात युवकांनी आघाडीवर राहिले पाहिजे. अशक्यचे शक्यतेत रूपांतर करण्याची धमक युवकांमध्ये असली पाहिजे. युवकांनी व्यसनापासून दूर राहून सृजनशील, क्रियाशील व्यक्तिमत्त्व बनवले पाहिजे असे मत माधुरी करडे हिने व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहयोगी प्राध्यापक डॉ. दिपक लोखंडे यांनी मांडले, सुत्रसंचालन कवी राजेश रेवले यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बसवलिंगआप्पा कलालबंडी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. सुनिल गलांडे, डॉ. सुहास जाधव, डॉ. नरेंद्र कांबळे, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. विद्या तायडे, डॉ. योगेश वाघमारे, अनंत मुंढे, श्री सुनिल गिरी, मनिषा बगाडे, माया भिकाणे, श्री यादव पाटील, इरफान पठाण, श्री स्वप्निल शिल्लार, श्री नंदकुमार मोरे व श्री प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले.

# युवकांनी पर्यावरणपुरक कृतिशील असावे

अंबाजोगाई (टा.वृ.) – अंबाजोगाई येथील कृषी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १२ ते १८ जानेवारी २०२१ या कालावधीत राष्ट्रीय युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे होते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी महाविद्यालय अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे होते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाईचे इंग्रजी विभाग प्रमुख तथा साहित्यिक, कवी मुकुंद राजपंखे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष पुंडलिकराव पवार, धनराज बापू मोरे, दत्तात्रय अंबाड, बालासाहेब आगळे, संभाजी अंबाड व पत्रकार संतोष बोबडे हे उपस्थित होते.



आपल्या अध्यक्षीय भाषणात कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, कृषीच्या युवकांनी प्रात्यक्षिक संस्कृती जोपासावी. अभ्यासात एकाग्रतेने चिंतन करून बौद्धिका बरोबरच प्रात्यक्षिकाला महत्त्व देणे क्रमप्राप्त आहे. यातूनच पर्यावरणाचा समतोल राखून हवामान बदलाचे आव्हान समर्थपणे पेलणे शक्य होईल.

मार्गदर्शक म्हणून बोलताना, कवी मुकुंद राजपंखे म्हणाले की,

बांडगुळे सविस्तर झाडांची
सरणे रचत असतात।
अशा वेळी झाडे
मुळापासून खचत असतात।
तेव्हा झाडांच्या बिया
सगळीकडे पसरूयात।

विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्य प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विद्या तायडे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. नरेंद्र कांबळे यांनी केले तर आभार भास्कर देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. दिपक लोखंडे, प्रा. सुनिल गलांडे, डॉ. योगेश वाघमारे, सुनिल गिरी, सय्यद इरफान, स्वप्निल शिल्लार व प्रकाश मुजमुले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सॅनिटायजरच्या चुकीच्या वापराने मुलं होऊ शकतात अंध

मुंबई (विशेष प्रतिनिधी ) – कोरोनाच्या संसर्गापासून बचाव होण्यासाठी हात स्वच्छ ठेवण्यासाठी हॅण्ड सॅनिटायजरचा वापर वाढला आहे. सॅनिटायझरमुळे विषाणूपासून बचाव होत असला तरी याचे लहान मुलांवर मोठे दुष्परिणाम होत आहेत. फ्रान्समध्ये करण्यात आलेल्या एका संशोधनानुसार हॅण्ड सॅनिटायझरच्या वापरामुळे मुलांच्या डोळ्यांवर परिणाम होणाऱ्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याच म्हटलं गेलंय. कोरोनाचा प्रादुर्भाव जसा वाढला तसा घरोघरी, कार्यालयात आता अगदी सार्वजनिक ठिकाणी सुद्धा सॅनिटायजरचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. सॅनिटायजरच्या चुकीच्या वापराने मुलं होऊ शकतात अंध! अभ्यासातून माहिती समोरकोरोनाच्या संसर्गापासून बचाव होण्यासाठी हात स्वच्छ ठेवण्यासाठी हॅण्ड सॅनिटायजरचा वापर वाढला आहे.

सॅनिटायझरमुळे विषाणूपासून बचाव होत असला तरी याचे लहान मुलांवर मोठे दुष्परिणाम होत आहेत.

आदर्श गावकरी

# जिजाऊंसह स्वामी विवेकानंदांकडून चारित्र्य, चरित्राची शिकवण: डॉ. ठोंबरे



**अंबाजोगाई :** जिजाऊ व स्वामी विवेकानंदाकडून कृषीच्या युवकांनी चारित्र्य आणि चरित्र यांची शिकवण घ्यावी, असे प्रतिपादन कृषि म हाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी अध्यक्ष समारोहात केले. येथील कृषी महाविद्यालयात दिनांक १२ जानेवारी रोजी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ समाजसेवक व साहित्यिक दगडू लोमटे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी सुरेश खंदारे व जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रताप नाळवंडीकर यांनी मांडले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिपक लोखंडे यांनी केले. तर आभार राष्ट्रीय सेवायोजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बसवलिंगआप्पा कलालबंडी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुहास जाधव, डॉ नरेंद्र कांबळे, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. विद्या तायडे, प्रा. योगेश वाघमारे, यादोराव पाटील, स्वप्नील शिल्लार, इरफान पठाण, राजेश रेवले, अनंत मुंडे, सुनील गिरी, प्रकाश मुजमुले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आदर्श गावकरी

## जगाच्या कल्याणार्थ देह झिजवणारेच खरे संत:निसर्ग मित्र राजेसाहेब किर्दंत

### राष्ट्रीय युवा सप्ताह; व्याख्यानमालेचे आयोजन



**अंबाजोगाई :** जे जगाच्या कल्याणासाठी किंबहुना आखिल सृष्टीच्या कल्याणासाठी आपला देह झिजवत असतात तेच खरे संत असतात, असे प्रतिपादन निसर्गमित्र राजेसाहेब किर्दंत यांनी केले. ते व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना बोलत होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे तर निसर्ग मित्र राजेसाहेब किर्दंत, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर व रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बसलींगाप्पा कलालबंडी यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील कृषि महाविद्यालयात, स्वामी विवेकानंद जयंतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १२ ते १८ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करण्यात येते. ते पुढे म्हणाले की, एकीकडे मानवनिर्मित प्रदूषणाचा अक्राळ- विक्राळ राक्षस समस्त जीवसृष्टी गुदमरुन टाकत असताना दुसरीकडे या जगाला नंदनवन बनवण्यासाठी काही महानुभाव अहोरात्र कष्टत असतात. अशा दोन भिन्न प्रवृत्तींचा संघर्ष अनादी काळापासून चालत आलेला आहे. यात सकारात्मकरित्या अहोरात्र कार्य करणारे विजय पथावर राहतात.

अध्यक्षीय समारोपात कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, कृषिच्या विद्यार्थ्यांनी विवेक जागृत ठेवून शेतकरी, कष्टकरी व पशुपालकांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कार्यरत रहावे. शुद्ध पर्यावरण हेच खरे समस्त जीवसृष्टीसाठी स्वच्छंदपणे जगण्याचे आणि बागडण्याचे अंगण असते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. बसवलींगाप्पा कलालबंडी यांनी केले, सुत्रसंचालन मंगेश देशमुख यांनी केले तर आभार संतोष बोरकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुनिल गलांडे, डॉ. सुहास जाधव, डॉ नरेंद्र कांबळे, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. विद्या तायडे, डॉ. योगेश वाघमारे, यादवराव पाटील, मनिषा बगाडे, स्वप्नील शिल्लार, इरफान पठाण, राजेश रेवले, अनंत मुंडे, सुनील गिरी व प्रकाश मुजमुले यांनी विशेष परिश्रम घेतले.

Auranagabad Edition


REDMI NOTE 8 PRO
BY YOGESH


REDMI NOTE 8 PRO
BY YOGESH


REDMI NOTE 8 PRO
BY YOGESH

### 3. Jagtik Jal Din (22March)

NSS unit of College of Agriculture, Ambajogai organized International Sparrow Day on 22-03-2021. Shri Prasaddada Chikse (Social Worker,Jaltadya) was the chief guest on this occasion. He raised the valueof setting water banksinsteadof moneybanksin todys period. Dr.B.M.Thombre, ADP,COA, Ambajogai in his presidential address emphasized importance of water literacyin todaysagricultural development. Dr.Pratap Nalwandikar (Ghym.,Vice President), Dr. B.M.Kalalbandi, (Programme officer, NSS), NSS volunteers, Teaching & Non-Teaching staff members also participated in the event. Total 60 participants participated in this event.

# पतपेढीऐवजी भूजलपेढी निर्माण करणे काळाची गरज : प्रसाद चिक्षे

## कृषी महाविद्यालयात जागतिक जलदिन साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)– भूगर्भातील पाण्याचा होणारा अतिरेकी उपसा आणि निर्दयीपणे केलेली वृक्षांची कत्तल यामुळे पावसावर होणारा विपरीत परिणाम आणि त्यातून निर्माण झालेले पाण्याचे दुर्भिक्ष्य,त्यामुळे मानव आज पाणीटंचाईला सामोरे जात आहे.हे आपणच अविवेकीपणाने ओढवून घेतलेले हे संकट आहे.निसर्ग मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहे.परंतु,माणसाची हाव तो पूर्ण करू शकत नाही.असे प्रतिपादन जलमित्र तथा समाजचिंतक प्रसाददादा चिक्षे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना केले.

ते कृषि महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत रासेयोच्या वतीने जागतिक जलदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.ते पुढे बोलताना म्हणाले की, पाणी हेच जीवन आहे हे




सर्वश्रुत आहे परंतु विद्यार्थ्यांनी आपलं जीवन पाण्याप्रमाणे प्रवाहीपणे जगलं पाहिजे. प्रसाददादा चिक्षे यांनी आपण करत असलेल्या पाणी बचतीच्या कामाविषयीचे अनूभवही कथन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय,अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे हे होते तर व्यासपीठावर डॉ.अरुण कदम व जिमखाना उपाध्यक्ष डॉ.प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.अध्यक्षीय समारोपात डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की,पाणी ही नैसर्गिक संपत्ती असून त्याचे जतन व संवर्धन आवश्यक आहे.कृषिच्या

पान ३ वर

# आदर्श गावकरी

## कृषी विकासात जलसाक्षरता महत्त्वाची:डॉ.ठोंबरे

### कृषी महाविद्यालयात जागतिक जल दिन साजरा

अंबाजोगाई / प्रतिनिधी

भूगर्भातील पाण्याचा होणारा अतिरेकी उपसा आणि निर्दयीपणे केलेली वृक्षांची कत्तल यामुळे पावसावर होणारा विपरीत परिणाम आणि त्यातून उत्पन्न झालेले पाण्याचे दुर्भिक्ष, त्यामुळे मानव आज पाणीटंचाईला सामोरे जात आहे. हे आपणच अविवेकीपणाने ओढवून घेतलेले संकट आहे. निसर्ग मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहे. परंतु माणसाची हाव तो पूर्ण करू शकत नाही, असे प्रतिपादन जलमित्र प्रसाद चिक्षे यांनी केले आहे. ते कृषी महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत रासेयोच्या वतीने जागतिक जलदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालय, अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे होते तर व्यासपीठावर डॉ. अरुण कदम व जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात, डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, पाणी ही नैसर्गिक संपत्ती असून त्याचे जतन व संवर्धन आवश्यक आहे. कृषीच्या




विद्यार्थ्यांनी कृषी अक्षराबरोबरच जलसाक्षर होऊन शेतकऱ्यांचे अन्नधान्य उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सहकार्य करावे. प्रक्षेत्रावर समतल चर विकसित करून जागेवर पाणी अडवून पूर्णतः जिरवावे. पाणी आणि वाणी समतोल वापरून वर्तमानाबरोबरच भविष्यकाळ ही सुनिश्चित करा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ.प्रताप नाळवंडीकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दिपक लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. संजय राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बसवलिंगाप्पा कलालबंडी, डॉ. सुहास जाधव, प्रा. सुनील गलांडे, डॉ. नरेंद्र कांबळे, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. योगेश वाघमारे, माया भिकाणे, अनंत मुंढे, सुनील गिरी, यादव पाटील, सय्यद इरफान, स्वप्निल शिल्लार, पुजा वावरगीरे, राजेश रेवले, प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले.

Auranagabad Edition

## 5. Jagtik Van Din (21 March)

NSS unit of College of Agriculture, Ambajogai organized Jagtik Van Din on 21-03-2021.Shri Sudhakr Deshmukh (Ecologist) was the chief guest on this occasion. Dr.B.M.Thombre, ADP,COA, Ambajogai in his presiendiatl address emphasized importance of trees in maintaining ecological balance and true friend for human mankind. Dr.Pratap Nalwandikar (Ghym.,Vice President), Dr. B.M.Kalalbandi, (Programme officer, NSS), NSS volunteers, Teaching & Non-Teaching staff members also participated in the event. Total 40 participants participated in this event. In photo also seen Shri Mohite (Taluka Forest Officer, Ambajogai).



लोकमत

# वृक्ष हेच असतात खरे परममित्र - बाबासाहेब ठोंबरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई :** कृषी महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत, राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने जागतिक वनदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून वृक्षमित्र सुधाकर देशमुख उपस्थित होते. व्यासपीठावर जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची उपस्थिती होती.

वृक्षमित्र सुधाकर देशमुख म्हणाले, 'आपण केलेल्या कामाचे इतरांनी केलेल्या कौतुकामुळे आपल्याला अधिक काम करण्याची ऊर्जा मिळते. मी खाल्लेल्या फळांच्या बिया खिशात ठेवून त्या वैराण व ओसाड माळरानावर लावल्या व त्यातूनच वनराई फुलत गेली. मला उत्तरोत्तर झाडांशी लळा लागत गेला व झाडांशी मी एकरूप झालो. आता मला झाडांची पाने, फुले व फांद्या या माझेच अवयव वाटतात.' प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, वनक्षेत्र वृद्धी करून, त्याचे संवर्धन योग्य पद्धतीने होणे आवश्यक असून, त्यातूनच अखंड प्राणवायू स्रोत निर्मिती होते. वृक्षांच्या विविध प्रजातीबरोबरच गुणात्मक दर्जा विकसित करण्यात कृषी स्नातकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कार्य करावे. वृक्ष संवर्धनातून पर्यावरण जनजागृती चळवळ अभिप्रेत आहे. वृक्षवल्ली हेच खरे परममित्र असून, झाडांशी प्रत्येकाने जिव्हाळ्याचे नाते जोडले पाहिजे. प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बसवलिंगाप्पा कलालबंडी यांनी केले. सूत्रसंचालन राजेश रेवले यांनी केले. डॉ. दीपक लोखंडे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी डॉ. नरेंद्र कांबळे, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. योगेश वाघमारे, सय्यद इरफान, स्वप्निल शिल्लार, प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले. झाडे लावणारा माणूस श्रीमंत असतो. ज्या झाडांमुळे आपण श्वास घेतो ती झाडे आपण अखेरच्या श्वासापर्यंत लावली, जगवली आणि जपली पाहिजेत. आईनंतर झाडांनीच मला जगवले, त्यामुळे झाडेच माझे खऱ्या अर्थाने पालक आहेत, असे भावोद्गारही यांनी काढले. 'झाडांसाठी जगणे आणि झाडांसाठी मरणे ' हेच माझे ध्येय आहे. माणसाने प्रामाणिक असले पाहिजे, असे देशमुख म्हणाले.

अंबाजोगाई कृषी महाविद्यालयात जागतिक वनदिन साजरा करण्यात आला.

Hello Beed
Page No. 4 Mar 23, 2021
Powered by: erelego.com



6. **Voters Awarenwss Day ( 24 January)** To create awareness on the significance of voting, a programme was organised. The NSS students of our college participated in the programme. Dr B.M.Thombre, ADP,COA,Ambajogai in his presidential speech guided about the importance of aware voters in development and maintaining of democracy. The programme was graced by thepresence of Shri Dattatrya Ambekar (Press Reporter), Gajanan Mudegaokar, Dr. Pratap Nalwandikar (Ghym. Vice President).NSS Volunters, teaching and nonteaching staff members were present for the programme.

R.N.I. No. /MAHMAR /231559 /2002

**कृषी सोबती**

दि.२६जाने.२०२१

## जागरूक मतदार समृद्ध लोकशाहीसाठी गरजेचा - सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे

### कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनाचे आयोजन








अंबाजोगाई(प्रतिनिधि):अंबाजोगाई येथील कृषि महाविद्यालयात, 'राष्ट्रीय मतदार दिनाचे' दि. २५/०१/२०२१ रोजी आयोजन करण्यात आले. भारतीय युवा मतदारांमध्ये मतदानाविषयी जाणीव व जागृती निर्माण व्हावी तसेच भारतातील युवा मतदारांना सक्रिय राजकारणात भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी २०११ पासून भारत निवडणूक आयोगाने २५ जानेवारी हा 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून दरवर्षी साजरा करण्याच्या निर्देशानुसार सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी महाविद्यालय अंबाजोगाई चे, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून दैनिक झुंजार नेता चे पत्रकार तथा बीड जिल्हा पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष श्री दत्तात्रेय आंबेकर होते तर दैनिक लोकाशा व मराठी पत्रकार परिषद शाखा आंबेजोगाई चे अध्यक्ष श्री गजानन मुडेगावकर, सामाजिक कार्यकर्ते तथा व्यवसायिक श्री शिरीष भावठाणकर व जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय भाषणात, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, जागृत मतदार हा समृद्ध लोकशाहीसाठी गरजेचा असतो. तसेच सुसज्ज व निर्भेळ लोकशाहीसाठी सर्व पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी जागृक मतदारांनी घेऊन लोकशाहीचे चित्र सुस्पष्ट करणे आवश्यक असते. असे प्रतिपादन पत्रकार दत्तात्रय आंबेकर यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पत्रकार श्री गजानन मुडेगावकर म्हणाले की, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य समजून करण्यात यावे व मतदानात सर्वांनीच सहभाग नोंदवावा.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थित असलेली सामाजिक कार्यकर्ते व व्यवसायिक श्री शिरीष भावठाणकर म्हणाले की, मतदान दिवस हा मर्यादित न राहता तो सर्व स्तरापर्यंत पोहोचून सर्वसमावेशक व्हावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांनी मांडले. सूत्रसंचालन डॉ. नरेशकुमार जायेवार यांनी केले तर आभार डॉ. विद्या तायडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सुहास जाधव, डॉ. सुनील गलांडे, प्रा. संजय राठोड, डॉ. नरेंद्र कांबळे, माया भिकाने, श्री यादव पाटील, सय्यद इरफान, पूजा वावरगीरे, श्री स्वप्निल शील्लार, श्री अनंत मुंडे श्री सुनील गिरी मनीषा बगाडे, श्री राजश रेवले यांनी परिश्रम घेतले.

झुंजार नेता | दिनांक: २६ जानेवारी २०२१ | वार: मंगळवार | पान ५

# जागरुक मतदार समृद्ध लोकशाहीसाठी गरजेचा-प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे

अंबाजोगाई दि.२५ (प्रतिनिधी)जागरुक मतदार समृद्ध लोकशाहीसाठी गरजेचा आहे असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी' राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

भारतीय युवा मतदारांमध्ये मतदानाविषयी जाणीव व जागृती निर्माण व्हावी तसेच भारतातील युवा मतदारांना सक्रिय राजकारणात भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी २०११ पासून भारत निवडणूक आयोगाने २५ जानेवारी हा ' राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून दरवर्षी साजरा करण्याच्या निर्देशानुसार सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी महाविद्यालय आंबेजोगाई चे, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दैनिक झुंजार नेता चे पत्रकार तथा बीड जिल्हा पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष श्री दत्तात्रय आंबेकर होते तर दैनिक लोकाशा व मराठी पत्रकार परिषद शाखा आंबेजोगाई चे अध्यक्ष श्री गजानन मुडेगावकर, सामाजिक कार्यकर्ते तथा व्यवसायिक श्री शिरीष भावठाणकर व जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, जागृत मतदार हा समृद्ध लोकशाहीसाठी गरजेचा असतो. तसेच सुसज्ज व निर्भेळ लोकशाहीसाठी सर्व पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी जागृक मतदारांनी घेऊन लोकशाहीचे चित्र सुस्पष्ट करणे आवश्यक असते असे प्रतिपादन पत्रकार दत्तात्रय आंबेकर यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पत्रकार श्री गजानन मुडेगावकर म्हणाले की, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य समजून करण्यात यावे व मतदानात सर्वांनीच सहभाग नोंदवावा.

या वेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते व व्यवसायिक श्री शिरीष भावठाणकर म्हणाले की, मतदान दिवस हा मर्यादित न राहता तो सर्व स्तरापर्यंत पोहोचून सर्वसमावेशक व्हावा.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांनी मांडले. सूत्रसंचालन डॉ. नरेशकुमार जायेवार यांनी केले तर आभार डॉ. विद्या तायडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सुहास जाधव, डॉ. सुनील गलांडे, प्रा. संजय राठोड, डॉ. नरेंद्र कांबळे, माया भिकाने, श्री यादव पाटील, सय्यद इरफान, पूजा वावरगीरे, श्री स्वप्निल शील्लार, श्री अनंत मुंडे श्री सुनील गिरी मनीषा बगाडे, श्री राजश रेवले यांनी परिश्रम घेतले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षा रोपण करण्यात आले.

**Krishi Sanjavani Saptha (1-7 July)** – Programme was launched through the RAWE NSS students and SMS team from college guided the farmers in agricultural production, milk production programme. Dr.A.S.Dhawan, Vice chancellor of the university graced the occasion as chief guest. He said that tree plantation plays an important role in keeping the environment clean, green and beautiful. About 25 NSS volunteers, Teaching & Non-Teaching staff members participated in the event.

# सुशोभित परिसरासाठी हवे वृक्षसंवर्धन-कुलगुरु डॉ.ढवण

अंबाजोगाई (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी संजीवनी सप्ताह अंतर्गत महाविद्यालयांच्या प्रक्षेत्रावर आनंदघन वन लागवड अंतर्गत वृक्षरोपांच्या लागवडीचा शुभारंभ गुरूवार,दिनांक २ जुलै रोजी परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अशोक ढवण यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ.अशोक



ढवण (परभणी) म्हणाले की,कृषि महाविद्यालयांचा परिसर हा वृक्षसंवर्धनातून सुशोभित करण्यात येईल.तर कृषि महाविद्यालयाच्या वतीने

**(पान दोनवर)**